## L. A. BILL No. XCV OF 2025.

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PUBLIC TRUSTS ACT.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९५.**

**महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

१९५० चा २९.

**ज्याअर्थी**, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहेः—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (तिसरी सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

एच बी१०२३–१

सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ५ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमाच्या कलम ५ मध्ये, पोट-कलम (२अ) मधील, खंड (ब) मधील, उप-खंड (चार) वगळण्यात येईल. १९५० चा २९.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक, धार्मिक व धर्मादाय विश्वस्तव्यवस्थांचे नियमन करण्यासाठी आणि त्यांच्या कारभारासाठी अधिक चांगली तरतूद करण्यासाठी, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, (१९५० चा २९) अधिनियमित केला आहे.

**२.** सर्वोच्च न्यायालयाने, ऑल इंडिया जजेस असोसिएशन आणि इतर विरुद्ध युनियन ऑफ इंडिया आणि इतर (२०२५ आय एन एस सी ७३५) या प्रकरणामधील, त्याच्या दिनांक २० मे, २०२५ च्या न्यायनिर्णयामध्ये असा निर्णय दिला आहे की, दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) पदाच्या परीक्षेस बसू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी, उक्त परीक्षेस पात्र होण्यासाठी किमान तीन वर्षे कालावधीसाठी विधी व्यवसाय केलेला असला पाहिजे अशी सुधारणा देशातील सर्व उच्च न्यायालये आणि राज्य शासने, संबंधित सेवा नियमांमध्ये करतील.

**३.** उक्त अधिनियमाच्या कलम ५ च्या पोट-कलम (२अ) च्या खंड (ब) च्या उप-खंड (चार) मध्ये अशी तरतूद केली आहे की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त म्हणून नेमावयाची व्यक्ती, जी कायद्याची नवीन पदवीधर आहे आणि जिने, प्रथम प्रयत्नात कायद्याची पदवी प्राप्त केली आहे आणि कायद्याच्या पदवीच्या किंवा पदव्युत्तर पदवीच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेमध्ये पंचावन्न टक्क्यांपेक्षा कमी नसतील इतके गुण मिळवलेले आहेत अशी व्यक्ती असेल.

सहाय्यक धर्मादाय आयुक्ताच्या कर्तव्यांचे आणि अभिनिर्णयकारी कार्यांचे एकसारखे स्वरूप विचारात घेऊन, आणि  सर्वोच्च न्यायालयाच्या निदेशांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्र शासनास, उक्त अधिनियमाच्या उक्त कलम ५ मध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट आहे असे वाटते.

**४.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २१ नोव्हेंबर, २०२५.

**देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९५ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२५ याचे परिशिष्ट.**

**(महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० यातील उतारे.)**

**(सन १९५० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९)**

**१. ते ४.** ** ** **

**५.** (१) व (२) ** ** **

धर्मादाय उप-आयुक्त आणि सहायक धर्मादाय आयुक्त

(२-अ) सहायक धर्मादाय आयुक्त म्हणून नेमावयाची व्यक्ती ही, पुढीलप्रमाणे अर्हता धारण करणारी असली पाहिजे-

(अ) ** ** **

(ब)(एक) ते (तीन) ** ** **

(चार) जी कायद्याद्वारे स्थापन केलेल्या कोणत्याही विद्यापीठाची किंवा याबाबतीत राज्य शासनाने मान्यता दिलेल्या अन्य कोणत्याही विद्यापीठाची कायद्याची नवीन पदवीधर आहे आणि जिने,-

(अ) प्रथम प्रयत्नात कायद्याची पदवी प्राप्त केली असेल ; आणि

(ब) कायद्याच्या पदवीच्या किंवा पदव्युत्तर पदवीच्या अंतिम वर्षाच्या परिक्षेमध्ये पंचावन्न टक्क्यांपेक्षा कमी नसतील इतके गुण मिळवलेले असतील ; किंवा

(पाच) ** ** **

(क)व (ड) ** ** **

**३.** ** ** **

**६. ते ८८.** ** ** **

**अनुसूची.** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९५.]**

**[ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री.**]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.